

# छोटे मावळे आणि स्वराज्याचे स्वप्न

bhoomi shelar





एका सुंदर आणि हिरव्यागार गावात पाच खास मित्र राहत होते—रुद्र, ओम, निधी, लावण्या आणि भूमी. रुद्र धाडसी होता, ओम हुशार होता, निधी काळजी घेणारी होती, लावण्या नेहमी आनंदी असायची आणि भूमी सगळ्यांना एकत्र ठेवायची. त्यांची मैत्री खूप घट्ट होती आणि ते नेहमी एकत्र खेळायचे.





एकदा शाळेत शिक्षकांनी त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणाची आणि स्वराज्याची गोष्ट सांगितली. ते ऐकून रुद्रच्या डोळ्यां चमक आली आणि तो उत्साहाने म्हणाला की आपणही छोटे मावळे बनूया. सर्व मित्रांनी आनंदाने टाळ्या वाजवून या कल्पनेचे स्वागत केले.



शाळा सुटल्यानंतर सर्व मित्र गावामागील जुन्या टेकडीवर गेले जे
पूर्वी मावळे राहायचे. भूमीने आपल्या बॅगेतून काढलेला सुंदर भगवा झेंड
ओमने एका लांब काठीला बांधला. तो झेंडा वाऱ्यात फडकताच सर्वांनी
'जय भवानी, जय शिवाजी' अशी गर्जना करत गावाच्या रक्षणाची शपथ
घेतली.





तेवढ्यात झुडपातून एका लहान कुत्र्याच्या पिल्लाचा रडण्याचा आवाज आला. लावण्याने त्याला अलगद उचलले आणि निधीने त्याला पाणी दिले, तेव्हा त्याच्या गळ्यातील घंटीवर 'मोती' असे नाव दिसले. रुद्रने तत्परतेने निर्णय घेतला की आपण सर्वांनी मिळून या मोतीला त्याच्या घरी पोहोचवायचे.





मोती सर्वांना वाट दाखवत पुढे पळत होता आणि सगळे त्याच्या मागे जंगलात पोहोचले. अचानक काळे ढग आले आणि विजांच्या कडकडाटासह जोराचा पाऊस सुरू झाला. सर्वजण थोडे घाबरले, पण रुद्रने धीर दिला आणि त्यांनी एका मोठ्या झाडाखाली आसरा घेतला.





पाऊस कमी झाल्यावर ओमला एका दगडाच्या मागे जुनी गुहा दिसली आणि सर्वजण आत गेले. गुहेच्या भिंतींवर जुनी चित्रे आणि तलवारीचे चिन्ह होते. तिथे एका कोपऱ्यात निधीला एक छोटी लाकडी पेटी सापडली, जी ओमने उघडली असता त्यात एक जुना रहस्यमय नकाशा मिळाला.





त्या जुन्या नकाशावर टेकड्या, झाडे आणि एका किल्ल्याचे चित्र काढलेले होते. त्यावर लिहिले होते की केवळ धैर्यवान आणि प्रामाणिक मुलांनाच हा खजिना मिळेल. लावण्या आणि रुद्र उत्साहाने उड्या मारु लागले, तर भूमीने सर्वांना सुरक्षित राहून प्रवास करण्याचे सुचवले.





दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व मित्रांनी पाठीवर पिशव्या घेऊन नकाशाच्या मदतीने खजिन्याचा प्रवास सुरू केला. मोतीसुद्धा त्यांच्यासोबत पुढे पुढे चालत होता. ओम नकाशा पाहत होता आणि त्यांनी सर्वात आधी वडाच्या मोठ्या झाडाजवळ पोहोचून पुढचा मार्ग शोधला.





पुढे जात असताना झाडावरील काही खोडकर माकडांनी लावण्याची फळांची पिशवी पळवली. रुद्र त्यांच्या मागे धावणार तितक्यात निधीने समजूतदारपणा दाखवून माकडांना केळी दिली. माकडांनी आनंदाने पिशवी परत केली, तेव्हा ओम म्हणाला की प्रेमाने स प्रश्न सुटू शकतात.





प्रवासाच्या शेवटी संध्याकाळच्या वेळी ते नदी पार करून एका भव्य जुन्या किल्ल्याजवळ पोहोचले. किल्ल्याचे दरवाजे जुने होते आणि वातावरण खूप गूढ वाटत होते. मोती धावत आत गेला आणि सर्व मित्र जेव्हा आत पोहोचले, तेव्हा त्यांना एका कोपऱ्यात एक मोठी आणि जुनी घंटा दिसली.